सं. फौ. ख. क्र.८५९/२०२१ निशाणी क्र.१५

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

नाव – ज्ञानेश्वर गणपतराव ठाकरे

वय – ५२ वर्षे, व्यवसाय – शेती,

पत्ता – रा. पारस, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि.२७.०१.२०२१ रोजी मला पोलीसांनी बाकराबाद येथे पंचनामा करण्याकामी बोलाविले होते. त्यानुसार मी बाकराबाद येथील रुसलाबाद रस्त्यावर गेलो. त्या ठिकाणी किशोर रायभान माळी, सचिन रायभान माळी व पोलीस व इतर लोक उपस्थिती होते. घटनास्थळावर टाटा ऐस कंपनीचे मालवाहू वाहन होते. त्या वाहनाखाली पाठच्या चाकाखाली माझे सासरे नामे रायभान इरभान माळी हे जखमी अवस्थेमध्ये पडलेले होते. पोलीसांनी सदर घटनास्थळाचा माझ्यासमक्ष पंचनामा केला. माझ्यासोबत दुसरे पंच कोण होते, हे मला आठवत नाही. आता मला सदर घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर अ.क्र.२ वर माझी सही असून सदर पंचनाम्यातील मजकूर हे मला माहीत नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, सदर पंचनाम्यावर मी सही वाचून केली होती, परंतु मला आता आठवत नाही. सदर सहीस **नि.क्र.१६** देण्यात येत आहे.

२. पोलीसांनी माझ्यासमक्ष मयताचा मरणोत्तर पंचनामा केला होता. आता मला सदर मरणोत्तर पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर अ.क्र.२ वर माझी सही आहे. सदर पंचनामा मी वाचून समजावून त्यावर सही केली होती त्यातील मजकूर पोलीसांनी खरा व बरोबर लिहीलेला आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येत आहे. त्यानंतर सदर अपघातातील मयत इसमास शवविच्छेदन करण्याकरीता अकोला येथील शासकीय रुग्णालय येथे घेवून गेले.

(साक्षीदार अभियोग पक्षास घटनास्थळ पंचनाम्यास पुरक साक्ष देत नसल्याकारणाने त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.)

३. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २७.०१.२०२१ रोजी बाकराबाद येथील रस्त्यावर झालेल्या अपघाताबाबतचे घटनास्थळ हे फिर्यादी सचिन माळी यांनी पोलीसांना घटनास्थळ पंचनाम्याच्यावेळी दाखविले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनामा करतेवेळी सचिन माळी त्या ठिकाणी हजर होते तसेच त्याच्यासोबत पोलीस अधिकारी संजय वानखडे व दुसरा पंच विलास मनोहर भांड हे देखील हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपघात करणारे वाहन क्र. एम.एच.३०–ए.बी.–०५९० हे देखील तेथे घटनास्थळी उभे होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस श्री. संजय वानखडे यांनी घटनास्थळ पंचनामा माझ्यासमक्ष व दुसरे पंच विलास भांड यांच्या समक्ष तयार करुन तो आम्हाला वाचण्यासाठी दिला होता. सदर पंचनामा हा मी व दुसरे पंच विलास भांड यांनी वाचून समजून त्यावर सही केली. आता मला दिनांक २७.०१.२०२१ रोजीचा घटनास्थळ पंचनामा तो तोच असून आमच्या समक्ष तयार केला होता, त्यातील मजकूर हा खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येत आहे. मी नितीन भाकरे यास ओळखतो, कारण माझे मेहुणे सचिन माळी यांनी मला सांगितले होते की, नितीन भाकरे हा सदर अपघातग्रस्त गाडीचा चालक होता.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन. एन. जामोदे यांच्या मार्फत उलटतपासः–</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, मी रसुलाबाद येथील रस्त्यावर गेलो होतो त्या ठिकाणी घटनास्थळाचा पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे आहे की, बाकराबाद या गावातून बाहेर जाण्याकरीता ४ ते ५ रस्ते आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मयत इसम हे माझे सासरे होते. सदर घटनास्थळ पंचनामा हा दुपारच्यावेळी सुरु केला होता व तो दु. ३.३० वा. सुमारास पुर्ण केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर दि.२७.०१.२०२१ रोजी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या सांगण्यावरुन घटनास्थळ पंचनाम्यावर सही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये सांगितल्याप्रमाणे पोलीसांनी कोणताही घटनास्थळ पंचनामा तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– २५.०६.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.06.25 15:06:06 +0530

**(दयानंद एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. दयानंद एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,<br>बाळापूर |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २५/०६/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २५/०६/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २५/०६/२०२५ |